International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 18 March - April - 2025

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे साहित्यक्षेत्रात योगदान

**प्रा. डॉ. विठ्ठल जीवतोडे**
*गोपिकाबाई सीताराम गावंडे महाविद्यालय, उमरखेड, जि. यवतमाळ*
*Corresponding Author – प्रा. डॉ. विठ्ठल जीवतोडे*
DOI - 10.5281/zenodo.15250612

वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची 'ग्रामगीता' ही आजच्या काळाची भगवद्‌गीताच आहे. भारतीय संस्कृतीची ग्रामगीता प्रतीक आहे. आदर्श ग्राम निर्माण करण्याची योजना त्यात आहे. मानवी जीवनाचे सार त्यात आहे. वं. महाराजांनी या ग्रामगीतेव्यतिरिक्त जीवनाला अत्यंत उपयुक्त व मानवी प्रगतीच्या दृष्टीने उन्नतीच्या शिखरावर पोहचविणारे अन्य साहित्य ही मराठी व हिंदी भाषेत रचलेले आहेत.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज साहित्यिक आहे की नाही? या संबंधी जे विचार मांडले जात आहेत, ते अत्यंत वादातीत आहेत. पण कधी कधी डोळ्यासमोर निर्माण होणारा प्रश्न मनाला सतत बोचतो. आम्ही जे लिखाण करतो ते स्वतःच्या आनंदासाठी की समाजोन्नतीसाठी ?

साहित्य म्हणजे काय? 'जे जीवनाच्या सहित चालते ते साहित्य' ही थोडावेळ आम्ही व्याख्या प्रमाण मानली तर राष्ट्रसंताच्या साहित्याला साहित्य म्हणायचे काय?

'ज्यामुळे जीवनाला जबरदस्त प्रेरणा लाभते. त्याला साहित्य म्हटले जाते. पण साहित्यालाही प्रेरणा कोठून लाभते. याचा निश्चित व परिपक्वतेने विचार आणि अभ्यास केल्यावर आपणास आढळून येईल की, उत्कट व धीरोदात्त जीवनाशिवाय भावोत्कट साहित्य निर्माण होऊ शकत नाही. हे सत्य आहे.'

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा साहित्य प्रवास:**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी विपुल साहित्यलेखन केले. साहित्यातील सर्व प्रकार त्यांनी आपल्या लेखनातून वापरले आहेत. मराठी भाषेसोबतच हिंदी भाषेतून त्यांनी जास्त लिखाण केले आहे. त्यांनी मराठी (११६९) भजने लिहिली. आणि हिंदीमधून (२३६९) भजने प्रकाशित आहेत. 'मेरी जीवनयात्रा', 'माझी आत्मकथा' हे पद्यामध्ये, हिंदी, मराठीत स्वतःचे आत्मचरित्र लिहिलेले आहे. जगदगुरू तुकाराम महाराजांसारखे (१९८७) अभंग 'अभंगगाथा' नावाने प्रसिद्ध आहेत. राष्ट्रसंताने दोन प्रवासवर्णने लिहिली आहेत. 'मेरी जपान यात्रा', मेरी नेपाळ यात्रा', 'लहर की बरखा' नावाने हिंदीमध्ये श्लोक तीन भागात प्रसिद्ध आहेत. 'आदेश रचना' मराठी श्लोकाचे पुस्तक प्रसिद्ध आहे. 'सदविचार प्रवाह' हिंदीतून 'म्हणी आणि सुभाषिते' लोकमनावर संस्कार करण्यासाठी लिहिलेत. त्याचप्रमाणे मराठीतून 'सुविचार स्मरणी, बोधवचने' प्रसिद्ध आहेत.

'ग्रामगीता' हा तर तुकडोजी महाराजांच्या साहित्यात अनमोल ठेवा आहे. ते ग्रामगीतेविषयी लिहितात.

**ग्रामगीता नव्हे पारायणासि। वाचता वाट दावी जनासि ।**
**समूळ बदलवी जीवनासी। मनी घेता अर्थ तिचा ।। ६६**
॥ (ग्रा. अ. ४१)

**ही नव्हे फुले टाकण्यासाठी। ही ग्रामाची उद्धारदृष्टी।**

**आजच्या युगाची संजीवनी बुटी। मानतो आम्ही ग्रामगीता ।। ६७।।**

मानव जीवनाची समाजघटना अशाप्रकारे 'ग्रामगीता' ग्रंथाचा सन्मान होऊ शकतो. राष्ट्रसंताचे साहित्य लोकांना अंधश्रद्धा सांगत नाही. अंधरुढ्यांना कडाडून विरोध करून सदविचाराचा नवसमाज सर्वधर्म, पंथ, संप्रदायाला जोडून मानवतेच्या आधारावर कसा उभा राहू शकतो. हे राष्ट्र सुजलाम्, सुफलाम्, बलशाली व्हावे आणि मग त्याने विश्वशांतीचा ध्यास घ्यावा.

राष्ट्रसंताची साहित्यदृष्टी वरील प्रकारची आहे इतिहास, धर्म, तत्त्वज्ञान आणि समाजसेवा यांच्या सहवासातून में साहित्य फुलत राहते ते नेहमी तेजस्वी, गंभीर, प्रसन्न व व्यक्ती आणि समाजाला पोषक होत असते. निरोगीपणाचे गुणधर्म त्यात एकवटलेले असतात. असे उच्चतम साहित्य मनाला भारावून टाकते. तर भाव भावनेचे उत्कृष्ट दर्शन त्या साहित्यांच्या पाऊला- पाऊलावर आपणास दिसून येते. असे साहित्य शब्दसृष्टीची उपासना करत नाहीत. तर जीवनामध्ये सतत तारुण्य चैतन्य जागवित राहते. त्याचबरोबर पराक्रम, श्रद्धा, उत्साह, आणि आर्यत्व जमवित राहणे हे खऱ्या साहित्यिकांचे प्रथम कर्तव्य होय, पण यासाठी साहित्यिकाला समाजापासून दूर राहता येणार नाही. त्याला समाजातच रहावे लागेल.

विदर्भ साहित्य संमेलन १९५३ च्या मार्चमध्ये गुरुकंज आश्रम मोझरी येथे संपन्न झाले. त्या १५ व्या साहित्य संमेलनाचे आणि तुमसरला संपन्न झालेल्या १८ व्या मराठी साहित्य संमेलनाचा उद्घाटक म्हणून बहुमान राष्ट्रसंताना मिळाला होता. त्या दोन्ही साहित्य संमेलनातील महाराजांची भाषणे गाजली- वाजली. राष्ट्रसंत साहित्याविषयी म्हणतात. "साहित्य मी शिकलो ते पुस्तकातून शिकलो नाही. अफाट जनसागरातून हृदयाच्या गाभाऱ्यातून आंतरिक उचंबळीतून मी साहित्य शिकलो. साहित्याची कल्पना ह्या जनसागरात मिळाली."

'साहित्याचे स्वतंत्र अनुशीलन करावयास नको किंवा भाषा कमाविण्यासाठी, शुद्ध ठेवण्यासाठी आणि तिचे तऱ्हेतऱ्हेचे व्यूह रचनांची आवश्यकता नाही. भाषा आणि साहित्य संस्कृतीची सर्वोच्च नसली. तरी प्रधान अंगे आहेत. त्याच्याद्वारा जीवन बोलके होते, एवढेच नव्हे तर स्वतःला ओळखू शकते. पण जीवनातील पराक्रमाची अपेक्षा करुन मात्र साहित्याला परिपुष्ट करणे शक्य नाही.

द. बा. कालेलकरांनी मांडलेले विचार राष्ट्रसंताच्या विचाराशी जुळणारे विचार आहेत. भाषा आणि साहित्य ही संस्कृतीची प्रधान अंगे आहेत. त्यापासून जीवन बोलके होते पण परिपुष्ट होत नाही.

**होईल जीवनाची उन्नती। ज्ञान विज्ञानाची प्रगती। ऐसी असावी ग्रंथ संपत्ति । गावोगावी ॥**

ही राष्ट्रसंताची साहित्यदृष्टी होती, साहित्यातून संस्कृतीचं दर्शन घडावं. पण मानवी जीवनाच्या पराक्रमाला उत्तेजन मिळून अखिल मानवाची उन्नती करायला प्रेरक, उपकारक ठरेल, ते खरे साहित्य होय.

राष्ट्रसंतांचे मुख्य केंद्र ग्राम आहे. ग्रामावरून ते राष्ट्राकडे वळले आहे. म्हणूनच त्यांनी सर्व प्रकारच्या ग्रंथाचा आदर केला आहे.

**गाव व्हाया वैकुंठपूर। काय कामी न येती ग्रंथ इतर । कोणत्या उपाये होतील संस्कार। दृढ गावचे ॥**

लोकांचे संस्कार उत्तमोत्तम करायचे लोकांबरोबरच समाज संस्कारित होत जाईल. मग राष्ट्र संस्कारित व्हायला वेळ लागणार नाही. मानवाचे जीवन सुंदर करून, सुखाचे अंकुर गावात फुलवायचे असेल. तर सर्व अवडंबर बाजूला सारावे. हिच साहित्यकांची जबाबदारी आहे. तिला ठोकरुन चालणार नाही. खरे साहित्य तेच की जे सामाजिक पुरुषार्थ, राजकीय चैतन्य, धर्मानुभवाची प्रयोगवीरता, राष्ट्रीय जागृती निर्माण करतात.

समाज निरोगी व सात्विक करण्याचा प्रयत्न करणे म्हणजे समाजातील असलेले भेद नष्ट करणे होय! जातिभेद, उच्चनिचतेचे खंडन करून लोक कल्याणांच्या दृष्टीने लेखनकार्य करायला हवे. अशुभतेचा **व्हास** करून मानवी जीवनाचे खरे सत्य

स्वरूप निर्भिडपणे सर्वसामान्य जनतेला सहजतेने पटेल या स्वरूपात मांडणे आवश्यक आहे. असे झाल्यास परिवर्तन निश्चित योग्यतेच्या मार्गाने घडून येईल. यावर राष्ट्रसंताचा दांडगा विश्वास आहे.

**'मै शब्द की खैरात हूँ, सब शब्द मेरे पास है**
**मुर्दे जगा दू शब्दसे। होता अशुभ का ऱ्हास है**
**मैं नहीं किस पहिचानता, मूंह देखके नही बोलता**
**सत्य क्या असत्य क्या सोचकर बात अपनी खोलता'**

समाजात शुभतेचा, सत्भावनाचा उदय घडवून आणणे व असत्याचा नाश करणे म्हणजे सत्यशोधन। हाच राष्ट्रसंताचा खरा उद्देश आहे. सत्यासत्यावर निर्भिडपणे विचार मांडून समाजोन्नतीला जे विचार पोषक होईल. तेच मांडणे हेच साहित्यिकांचे कर्तव्य होय! त्याला राष्ट्रसंत विसरले नाहीत.

**वाद नकोत समन्वय पाहिजे:**

राष्ट्रसंत साहित्यातील कुठल्याही वादात प्रत्यक्ष पडलेले नाही. कले करिता कला, जीवनाकरिता कला, उद्धबोधनाकरिता कला अशा स्वरुपातून कलावाद, जीवनवाद किंवा प्रगतीवाद यावर आपले विचार मांडले नाही. खरा साहित्यिक कुठल्याही वादावर बसून राहत नाही. जो समाजाशी प्रामाणिक आहे. त्याला समाजाच्या उन्नतीला योग्य साहित्य कोणते व ते कसे निर्माण करता येईल हाच विचार असतो. हे सर्व वाद म्हणजे शरीरांच्या एका एका अंगासारखे आहेत. सर्व अंग मिळून शरीर होत असते. कलेशिवाय आनंद नाही. कला ही मानवाला भूषण आहे. हे जरी खरे असले तरी जीवनाच्या सत्य स्वरुपाचे, नीतीनियमाचे दर्शन त्यातून घडायला पाहिजे.

निरपेक्ष आनंद मानवाला जर प्राप्त करायचा असेल तर प्रत्येक व्यक्तिच्या जीवनात कलेचे महत्त्व खूप मोठे आहे. जीवनातील आनंद नष्ट झाला की, जीवन रुक्षमय होते. कै. वि. स. खांडेकर म्हणतात, 'चेहऱ्यावरील हास्य नष्ट झाले की माणूस म्हातारा झाला असे समजावे.

**'अहो! जीवनाची एक तरी कला असावी लागते**
**मानवाला।**
**तरीच तो 'मानव' शोभला। नाही तरी कला जीवनांचा ॥**
**२८ ॥** (ग्रा.अ. १३)

पण कला व जीवन यांची फारकत त्यांनी केली नाही. कला जीवनात आनंद निर्माण करते म्हणून आनंदाची निर्मिती करणे हाच कलावंताचा धर्म नाही. त्याविषयी विचार मांडतांना. ते म्हणतात की, 'कला ही जीवनात गुंतागुंती निर्माण करणारी नसावी. सरळ व सात्विकतेचं वरदान ठरून प्रत्येकांच्या अंतःकरणात निर्मळता पवित्रता निर्माण करणारी असावी. सर्वात श्रेष्ठ कला म्हणून जीवनकलेकडे बघताना ते दिसून येतात.'

कलेचा आनंद उपभोगतांना ती दुसऱ्यालाही उपकारक व्हायला पाहिजे. स्वतः जीवन जगावे व इतरांनाही जीवन जगण्यांस प्रवृत्त करावे. असे सामर्थ्य ज्या कलेत आहे त्याचा राष्ट्रसंत मनमोकळेपणाने स्वीकार करतात. मनुष्य म्हटला की, तो समुदायाशिवाय जीवन जगू शकत नाही. स्वतःच्या जीवनाबरोबर समुदायाचे जीवन उन्नत करणे व परस्परांत सौख्यांची भावना निर्माण करुन दुरितांचे तिमीर हटविण्याचे कार्य त्यांनी करावे. असे करणारा खरा जीवन कलावादी होय! कलेचा धर्म परस्परांना सहकार्य करण्यांचा, दुर्बलांना उन्नत करण्याचा आहे. त्याचबरोबर कुणावरही अत्याचार, अन्याय होणार नाही. याची दक्षता बाळगणे हिच साहित्यिक वृत्ती आहे. सह्दयतेचे लक्षण आहे.

**राष्ट्रसंताच्या जीवनदायी साहित्याचा प्रभावः**

राष्ट्रसंताचे साहित्य खऱ्या मानवाचे जीवन घडविणारे, त्यांच्या दुःखांना, आशा आकांक्षाना वाचा फोडणारे, समतावादी स्वरुपाचे, विश्वाप्रत जाऊन पोहचणारे व प्रत्येकाला आपलेसे करणारे आहे.

ज्याचे साहित्य जीवनदायी, पौष्टिक व प्रगतीशील असते त्यांनी शैली कशीही असो, त्यांची भाषा कितीही सामान्य असो अलंकार रहित असो, त्यांचे साहित्य लोकांना वाचावेसे वाटते. त्याशिवाय

गत्यंतर नसते. हा अनुभव राष्ट्रसंताच्या साहित्याबाबत आहे. राष्ट्रसंताची भाषाशैली अत्यंत साधी सरळ व सोपी आहे. त्यांनी साहित्याविषयी व ग्रंथरचनेविषयी काढलेले उद्‌गार वरील मताला पुष्टी देणारे आहे

**'ग्रंथ ओवी बद्धचि असावे । हे ही म्हणणे सोडून द्यावे ।**
**सहज कळेल तेचि उत्तम समजावे। गद्य पद्य'**

याच तत्त्वाप्रमाणे त्यांची ग्रंथरचना अत्यंत साधी आहे. ती अलंकारप्रचूर नाही की बोजड नाही कारण तशी रचना असली की, अर्थाने अनर्थ व्हायला लागतात. हा दोष टाळता येत नाही.

**रुपकात्मक पूर्वीचे ग्रंथ। जनसाधारण भरले तेथ।**
**काढू लागले उलटा अर्थ । विश्वास सहसा बसेना ।।**

वरील प्रकारचा अनर्थ टाळण्यासाठी व सर्वांना सहज कळण्यासाठी राष्ट्रसंतानी अलंकार प्रचूर बोजड शब्दाचा उपयोग आपल्या साहित्यात केला नाही. अलंकारयुक्त, नादमधुर, व नटवी शैली फक्त लोकांना आकर्षण करू शकते. पण लोकांना देण्याचं बळ तिच्यात असतेच असे नाही.

**साहित्य प्रचारक व समाज:**

साहित्यातून समाजाचे पोषण व्हायला पाहिजे. हे एकदा मान्य केल्यावर समाज जीवनाच्या उन्नतीसाठी साहित्यांची भूमिका बलदंड असायला पाहिजे. केवळ पुस्तकांतून किंवा लेखणीतून मांडलेले विचार समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याचे कार्य, त्यांना समजावून सांगण्याचे कार्य महत्त्वाचे ठरते. कारण मानव अनुकरणीय प्राणी आहे. अज्ञानी मानवाला त्यांचे जीवन समजावून सांगणे आवश्यक आहे तसेच थोरांच्या जीवनातील आदर्श समजावून सांगावे लागतात. सर्वच गोष्टीत कायद्यांचे दडपण पाहून लोक घाबरतील. पण त्यांचे घाबरणे दीर्घकाळ टिकत नाही. लोकांनी योग्यतेचा विचार व आचार प्रचारक शिकवू शकतात.

महात्मा गांधीनी ज्याच्या साधनामार्गाचा जीवनमार्ग म्हणून पुरस्कार केला आहे. त्या आत्मसाक्षात्कारी पुरुषाला जगातील शोषण, गुलामी, अपराध, अन्याय, अत्याचार अगर अमानुषता उघड्या डोळ्यांनी पाहणे आणि तरी निर्विकारपणे अध्यात्मसाधनेत श्रेय शोधणे शोभत नाही, असे राष्ट्रसंतांचे मत आहे. या मागे विश्वसाक्षात्कार हा आत्मसाक्षात्काराचाच अविच्छिन्न भाग असल्याची भूमिका अनुस्यूत असून अखंड एकात्म साक्षात्काराच्या दृष्टीने विश्वकल्याणाची आस धरुन विश्वकल्याणाच्या मार्गानेच जाणे आत्मसाक्षात्कारी पुरुषालाही भाग आहे. असा राष्ट्रसंतांचा निर्णय आहे. थोडक्यात, निव्वळ 'अहं ब्रह्मास्मि' हा भाव अंतरात्म्यात घुमवून नव्हे; तर ब्रह्माइतके व्यापक विशाल व सखोल सत्त्व अंतरात्म्यात भिनवून विश्व ब्रह्मवादी भूमिका अंतरात्म्यात अनुभवणाराच खरा आत्मसाक्षात्कारी ठरेल. असा राष्ट्रसंतांचा निर्वाळा आहे. साहित्याची साधना (अनुभूती अभिव्यक्ती) ही एकापरीने आत्मसाक्षात्कार, आत्मविष्कार याच अस्सल आध्यात्मिक प्रकृती प्रकाराची असल्यामुळे संतश्रेष्ठ तुकारामाच्या वचनाप्रमाणे **'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग; बाह्य विश्व आणि मन'** अशा दुहेरी संघर्षाला साहित्यकाराने सिद्ध असले पाहिजे, अशी या स्थळी राष्ट्रसंतांची अपेक्षा आहे. **'प्रत्येक मानव माझा आहे!'** या भूमिकेमध्ये जनाची लोकांविषयीची आत्मियता अभिप्रेत आहे. ही आत्मियता महणजे जननिष्ठे' चाच एक पदर होय. जनसाहित्य विचारात साहित्यिकांचे पहिले लक्षण त्याच्या जाणीवेची जननिष्ठत्ता हेच आहे. जननिष्ठा जाणीवेतून त्याला जीवनाचा वेध घ्यायचा म्हणजे जीवनानुभूती ग्रहण करायची असते.

देवाची मध्यस्थी निरर्थक ठरल्याच्या या काळात यापुढची मानव्यविकासाची मोतीच जबाबदारी राष्ट्रसंतानी साहित्यिकांच्या शिरावर टाकली आहे. या संदर्भात राष्ट्रसंत म्हणतात. “तेच (निष्काम प्रेमाने दोन माणसे एकत्र आणून त्याद्वारे मातव्यविकास साधण्याचे) कार्य कवीचा साहित्यिकांना आपल्या रचनेच्या बळाने आज सफल करावयाचे आहे.” मंदिर, मूर्ती, पूजा, देव से साधन अव्हेरून राष्ट्रसंत या स्थळी साहित्यिकांच्या रचनासामर्थ्यावर भिस्त ठेवीत आहेत. ही बात जेवढी

अनपेक्षित तेवढीच राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या वैश्विक कल्पकदृष्टीची (व्हिजन) परिपाकयही होय. परंतु हजारो वर्षांत देवाच्या 'दलाली' ने जे साध्य झाले नाही. ते आत्ता साहित्यिक कवी आपल्या रचनासामर्थ्याने कसे साध्य करु शकतील? हा इथला खरा प्रश्न आहे आणि याचे उत्तर राष्ट्रसंतानीच काही सूचनांद्वारे दिले आहे

१. जनभाषेच्या आधारे जीवनकाव्य रंगवून माणसाच्या हृदयातले देवत्व त्यांनी जागवायचे आहे.
२. मेल्यानंतर मिळणाऱ्या स्वर्गाच्या कथा सांगण्याऐवजी, या जगातच स्वर्ग निर्माण करण्याचा पाठ त्यांनी शिकवायचा आहे.
३. स्वप्नसौंदर्य शुद्ध प्रक्रियेने व्यक्त करून ते प्रत्यक्ष आकारास आणण्यासाठी त्यांनी आपली शक्ती वेचावयाची आहे.
४. माणुसकीची व श्रमाची प्रतिष्ठा देशात अशी स्फूर्ती व राष्ट्रीयतेने राष्ट्र जगेल असे ओज त्यांनी आपल्या रचनेत ओतावयाचे आहे

साहित्य हे 'जनासाठी', 'जन' म्हणजे भेदकारक उपाधी झुगारुन निखळ 'मानवी' जाणीव धारण करणारा सत्त्वशील मानव जननिष्ठा' म्हणजे अशा मानवी सत्त्वावरील अभंग निष्ठा; आणि अशा जननिष्ठ जाणिवेतून घेतलेला जीवनाचा वेध म्हणजे 'जनसाहित्य' या स्थळी प्रस्तुत असणारी सत्य (जनजीवनाचे वास्तव आणि शिव, मानवी हक्क व अधिकाराची स्थापना) ही मूल्ये संस्कृतिसापेक्ष असून, ही स्वभाषा संस्कृती व साहित्यकृतीतून मनोगोचर होत असताना भारतीय आणि वैश्विक मानवतेचे मूल्यदर्शन तिने घडवावे, अशीच जनसाहित्याचीही मान्यता आहे.

पुढे राष्ट्रसंत म्हणतात, प्रत्येक साहित्यकर्माने आपल्या भाषेचे प्रेम कायम ठेवून भारतीयता इतकेच नव्हे तर विश्वात्मकतासुद्धा साधणे इष्ट आहे. अर्थात हे देखील भान मराठी साहित्यिकांनी बाळगले पाहिजे की, सर्व भारतीय भाषा या त्या त्या स्थानिक प्रादेशिक संस्कृतीच्या वाचक आणि वाहक असून आपापल्या जागी भारतीय संस्कृतीच्या प्रदेश विशिष्ट अंगाचेच वहन त्या करीत आहेत. ही एकेक भाषा म्हणजे भारतीय संस्कृतीचे एकेक अंग असून त्या सर्वांच्या स्वायत्ततेची नाळ सर्वसमावेशक अशा 'भारतीय संस्कृती' नावाच्या 'अंगी' च्या समृद्धीशी जुळलेली राहणार आहे नव्हे, प्रयत्नपूर्वक तशी ती राखावीच लागणार आहे. म्हणजेच प्रादेशिक भाषासंस्कृतीचा विकास हा 'अंग' आणि 'अंगी' अशा दोन पातळ्यावर करीत न्यावा लागणार आहे. त्या बाबतीतला सर्वमान्य राजमार्ग भाषाभगिनीमधली परस्पर देवाणघेवाण, अक्षरकृतीचे अनुवाद, तौलानिक साहित्याभाषा व परस्पर सन्मानाच आदानप्रदान हाच ठरू शकेल. भारतीयता गाठीशी असलेला मराठीभाषी साहित्यिक हा भारतीयतेच्याच बळावर वैश्विक साहित्यसृष्टीचा सदस्य होऊ शकतो, भारत मातेला डावलून अर्जित केलेल्या परभूततेतून नव्हे! मात्र मुळात मराठीपणाच उणावलेल्या आणि त्यातही पुढे जाऊन भारतीयताच गमावलेल्या परधार्जिण्या जाणीवेचे लेखन स्वतःची आगळी ओळखच हरवून बसणार, आणि मग वैश्विक तर राहोच, पण साध्या प्रादेशिक साहित्याच्या अस्सलतेच्या कडानाही स्पर्श न करण्याइतके ते करंटे निपजणार, यात शंका नाही. जनसाहित्य हे सामान्य माणसाचे 'जना' च्या पातळीवर उपयन करणारे साहित्य तर असतेच शिवाय क्रियाशील होण्यासाठी त्याच्या जाणिवांमध्ये ऊर्जा प्रवर्तित करणारेही साहित्य ते असते. त्याचबरोबर समाजाच्या कोणत्याही समूहगटात मोडणाऱ्या मानवी व्यक्ती अगर गटाने सुख दुःखानुभाव हे 'शब्द' मानवी पातळीवर नेऊन अभिव्यक्त करणारी जनसाहित्याची अनुभवीत आहे आणि अभिव्यक्तिरीतसुद्धा तीच आहे.

साऱ्या बाबी विचारात घेता, राष्ट्रसंतांची साहित्यविषयक भूमिका महत्त्वाच्या सर्व मुद्यांवर जनसाहित्य विचाराशी जुळणारी असल्याचा निष्कर्षच हाती येईल.

**साहित्यिकांचे अभिप्राय:**

वं. महाराजांच्या साहित्य प्रभेविषयी अनेक सुप्रसिद्ध साहित्यिकांनी आपले विचार व्यक्त केले आहेत. त्यापैकी काही सुप्रसिद्ध साहित्यिकाने अभिप्राय आहेत.

**१.** वि. स. खांडेकर म्हणतात.... 'महाराजांच्या साहित्यात कवी, वीर व संत या तीन भूमिका आत्मविकासाचा मार्ग दाखविणाऱ्या विशेषाचे मोठे व्यवहारोपयोगी असे संमेलन आहे. ज्ञानेश्वरांपासून महाराष्ट्रातले अनेक लहान मोठे संत बंडखोरपणाचे निशाण घेऊन विषमतेविरुद्ध झुंजत समाजाला पुढे पुढे नेत आले आहेत. संत तुकडोजी त्याच पवित्र परंपरेचे वारस आहेत. (श्रीगुरुदेव एप्रिल १९५०)

२. राष्ट्रसंताच्या साहित्याचे संपादक श्री सुदाम सावरकर (१९६१) लिहितात.... महाराजांची साहित्यसेवा ही 'स्वान्तः सुखाय' किंवा 'मनोविनोदाय' अशीच नसून ती प्रामुख्याने 'बहुजनहिताय' आहे. ती तपोभूमी वाटीकाच नव्हे तर बहरलेली लोकोपयोगी फळबागही आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी भजनाचे माध्यम निवडून लोकजागृती केली. 'ग्रामगीता' आणि इतर शंभरेक पुस्तकांतून सुजलाम् सुफलाम्' भारताचा आराखडा मांडला. राष्ट्रसंताचे वैचारिक वारसदार तुकारामदादा गीताचार्यांनी आदर्श गावे निर्माण केली.

सुदाम सावरकर, डॉ.भाऊ मांडवकर, तु.ना.काटकर, प्रा.मधुकर केचे बाबा मोहोड,रामकृष्ण बेलुरकर अशा कितीतरी साहित्यिकांशी वं. महाराजांचे अत्यंत स्नेहाचे संबंध होते. अनेक साहित्यिकांना वं. महाराजांनी लेखन करण्यास प्रोत्साहन दिले. असे वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे साहित्य क्षेत्रात अढळस्थान होते.

**संदर्भ ग्रंथ :**

१) 'ग्रामगीता' वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज' - संपादक, सावरकर, स्व.सुदाम -एकोणतीसावी आवृत्ती २०१६, श्री गुरुदेव प्रकाशन, गुरुकुंज आश्रम ता. तिवसा, जि. अमरावती

२) 'राष्ट्रसंतः वैचारिक क्रांती' लेखकः पदवाड, प्रा.बाळ प्रथम आवृत्ती- १५ आक्टोबर, १९८४, विजया प्रकाशन, नागपूर

३) 'मानवतेचे महापुजारी राष्ट्रसंत तुकडोजी (जीवन व कार्य)' लेखक कडवे, प्रा. रघुनाथ द्वितीय आवृत्ती- ११ आक्टोबर २०१२, अमोल प्रकाशन, नागपूर

४) 'राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व्यक्ती आणि वाङ्मय' संपादक : काळे, अक्षयकुमार प्रथमावृत्ती १५ ऑगस्ट २००८, प्रकाशक- विसा बुक्स, नागपूर

५) 'हाती न घेता तलवार बुद्ध राज्य करी जगावर' संपादक, रक्षक, ज्ञानेश्वर दुर्गादास प्रकाशन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, १४ एप्रिल २०१५, बहुजन साहित्य प्रसार केंद्र, नागपूर